[illegible] खाना जरके प्याला । कोई भरा दीलको । अल्ला, मौला, राम, रहिम । दोनो भरा नजरो ॥ नजर भर ॥ ३ ॥ गुरुदास कहे सुनो भाईयो । फिरला जाने मनको । भाव भगतसे साई खडा है देखो जाके शीरडीमे ॥ नजरभर० ॥ ४ ॥

## पद ४

शिरडीग्रामीं सद्गुरुस्वामी साईनाथ महाराज । दीनांचे पुरवीतसे काज ॥ धृ० ॥ भक्तासाठीं धांवत येती शिरडीग्रामाला । लीला-चरित्रें करूनी दाविली ब्रह्मभास जगीं गमला ॥ शिरडी ॥ १ ॥ एके दिवशीं प्रातःकाळी नवलचि देखिलें । माप गव्हाचें भरभरूनी सुपीं हो काढीलें ॥ दळण मांडिलें पीठ काढिलें । टाकिलें ओढ्याकाठीं ॥ त्यानी महामारीही गेली । समर्थलीला उलटी ॥ शिरडी ॥ २ ॥ औरंगाबादी धुपखेडेगांवीं । चांद पाटील । घोडा हरवला वाटेंत तेव्हां झाले दीलगीर ॥ खांदा खोगिर वाट चालती । हाक मारिली बाबानें ॥ चिलीम भरोनी चिमटा रोवुनी । निखार काढीले त्यानें ॥ पाणी नाही सटका आपटीला पाणी काढिलें ॥ चमत्कार ऐसा करूनी चिलीम । ओढीली दोघांनीं ॥ शिरडी ॥ ३ ॥ दीपोत्सवाची हौस मोठी, साई समर्थासीं । नित्य आणिती तेल मागुनी दीपोत्सव करिती ॥ कंटाळले वाणी एके दिवशीं, तेल नाही म्हणती । नीमूट-पणें मशीदींत येऊनी नवलची हो करितीं ॥ अल्प होतें तेल टमरेलीं, पाणी टाकीती । दोन्हीं एके ठिकाणीं करूनी, प्राशन हो करीती ॥ हातीं टमरेल पाणी भरूनी, पंत्यांसी घालीती ॥ पेटविल्या पंत्या तेल नसुनी, रात्रभर जळती ॥ शिरडी ॥ ४ ॥

# अध्याय २० वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
श्रीकुलदेवतायैनमः । श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥
श्रीसद्गुरुसाईनाथायनमः

ॐनमोजी गुरु मानससरा । प्रसादवाक्य मुक्ताकरा ॥
अनन्यभक्त मराळ निकरा । चरणीं थारा तुजपाशीं ॥ १ ॥

सदाश्रया महा उदारा । घालूनि प्रसाद मुक्तचारा ॥
देऊनि निज विश्रांती आसरा । येरझारा चुकविसी ॥ २ ॥

काय तो साई सिद्धाश्रम । दर्शनें निवे संसारश्रम ॥
निकटवर्ती भवभ्रम । दवडी अविश्रम सहवासें ॥ ३ ॥

साई मूळ निराकार । भक्तकाजालागीं साकार ॥
करोनि माया नटीचा स्वीकार ॥ खेळला साचार नट जैसा ॥ ४ ॥

ऐसिया साईस आणूं ध्यानीं । क्षणभर जाऊं शिरडि स्थानीं ॥
दोन प्रहरच्या आरती मागुनी । लक्ष लावूनि पाहूंया ॥ ५ ॥

माध्यान्ही आरतीपाठी । येऊनि मशीदीच्या काठीं ॥
महाराज अति कृपादृष्टी । उदी वाटीत भक्तांस ॥ ६ ॥

भक्तही प्रेमळ उठाउठी । घालीत समचरणीं मिठी ।
उभ्यानें मुख न्याहाळितां दृष्टी । भोगीत वृष्टी उदीची ॥ ७ ॥

बाबाही भरभरोनि मुष्टी । घालीत भक्तांच्या करसंपुटीं ॥
अंगुष्ठें लावीत तयांच्या ललाटीं । प्रेम पोटीं अनिवार ॥ ८ ॥

जा भाऊ जा जेवावयास । जा आण्णा जा तूं खा सुग्रास ॥
जा अवघे जा निजस्थानास । प्रत्येकास वदत ते ॥ ९ ॥
आतां जरी तें पाहूं न मिळे । परि ते सर्व गत सोहळे ॥
शिरडीस त्या त्या स्थानीं त्या त्या वेळे । दृढ ध्यानबळें दिसतात ॥१०॥
असो ऐसें करून ध्यान ॥ अंगुष्ठापासून मुखावलोकन ॥
प्रेमें घालूनि लोटांगण । कथानुसंधान चालवूं ॥ ११ ॥
गताध्यायाचिया अंतीं । कथिलें होतें श्रोतयांप्रतीं ॥
कीं बाबांहीं मोलकरिणी हातीं । अर्थ श्रुतीचा उकलविला ॥ १२ ॥
ईशावास्य भावार्थ बोधिनी । आरंभिली होती गणुदासांनीं ॥
आशंका उपजतांच सद्गुरुचरणीं । घातली नेऊन शिर्डीस ॥ १३ ॥
बाबा तैं वदले जें वचन । तुझ्या या शंकेचें निवारण ॥
करील काकाच्या घरची मोलकरीण । जाशील परतोन ते समयीं॥१४॥
तेंच कीं सांप्रत कथानुसंधान । आतां येथून चालवूं आपण ॥
श्रोतीं होईजे दत्तावधान । होईल श्रवण अविकळ ॥ १५ ॥
संकृत भाषानेभिज्ञार्थ[1] । ईशावास्योपनिषदर्थ[2]
ओवीद्वारा पदपदार्थ । संकलितार्थ विवरावा ॥ १६ ॥
ऐसी आस्था धरोनि मनीं । ईशावास्य भावार्थबोधिनी ॥
प्राकृत भाषा सुगम साधनीं । गणुदासांनीं आरंभिली ॥ १७ ॥
गूढार्थ प्रचुर हें उपनिषद । भाषांतर झालें पदप्रपद ॥
विना अंतर्गत रहस्य बोध । होई न आनंद मनातें ॥ १८ ॥
चहूं वेदांचें जें सार । तेंच उपनिषदांचें भांडार ॥
हरि गुरुकृपा नसलियावर । अतिदुस्तर गाठावया ॥ १९ ॥
म्हणेल कोणी मी सज्ञान । अपुल्या मतें करोनि यत्न ॥
करीन उपनिषदांचें आकलन । प्रतिपादन यथार्थ ॥ २० ॥

---

१ संस्कृत भाषा न जाणणारां करितां २ उपनिषदाचा अर्थ.

तरी तें कल्पांतींही न घडे । हेंतो गुरुकृपा नसतां सांकडें ॥
गुह्यप्रमेय हातीं न चढे । मार्गीं अवघड पदोपदीं ॥ २१ ॥
तेंच जो गुरुपदीं जडे । तया नाहीं अणुमात्र सांकडें ॥
तयाचिया दृष्टीपुढें । आपाप उघडे गूढार्थ ॥ २२ ॥
आत्मज्ञानाचें हें शास्त्र । जन्ममरणोच्छेदक शस्त्र ॥
जे निरभिमान निःसंगमात्र । तेच सत्पात्र विवेचना ॥ २३ ॥
ऐसीयांची कास धरितां । क्षणांत उपजे अर्थबोधकता ॥
बुद्धीची जाई प्रतिबद्धकता । होय विशदता गूढार्थीं ॥ २४ ॥
ईशावास्य प्राकृतीं आणितां । दासगणूची हेच अवस्था ॥
परी साईनाथें कृपा करितां । तद्दुर्गमता[1] विरोली[2] ॥ २५ ॥
गीर्वाण भाषेचें अल्पज्ञान । तत्रापि आचार्य विद्यारण्य ॥
वंदून साईबाबांचे चरण । ओवी लेखन आदरिलें ॥ २६ ॥
गणुदास-वाणी दुग्धधारा । प्रसाद साईचा तयांत शर्करा ॥
तेथील माधूर्य परंपरा । क्षणैक आदराजी श्रोते ॥ २७ ॥
असो हें बोधिनी[3] दिग्दर्शन । हृद्गतार्था[4] करा मूलावलोकन[5] ॥
या मत्कथेचें अनुसंधान । आहे कीं आन अवधारा ॥ २८ ॥
निजभक्त करितां ग्रंथावलोकन । आढळे जंधीं[6] दुर्बोध वचन ॥
महाराज करिती समाधान । बोलल्यावीण कैसेंपा ॥ २९ ॥
ह्याच या कथेचा हेत । श्रोतयां व्हावा तात्पर्य विदित ॥
इतुकेंच माझें मनोगत । दत्तचित्त परिसाजी ॥ ३० ॥
ओवीबद्ध टीका केली । विद्वज्जनांस मान्य झाली ॥
गणुदासांची मनीषा फिटली । आशंका राहिली पैं एक ॥ ३१ ॥

---

१ त्याचा अवघडपणा. २ नाहींसी झाली. ३ भावार्थबोधिनी. ४ या भावार्थबोधिनीचें हृद्गत म्हणजे मर्म जाणावयास. ५ मूळग्रंथाचें अवलोकन. ६ जेव्हां.

मांडिली ती पंडितांसमोर। ऊहापोह केला थोर ॥
परी होईना समाधानपर। शंका निर्धार कोणाही ॥ ३२ ॥
इतुक्यांत शिरडीस कांहीं कारणें। दासगणूचें घडलें जाणें ॥
आशंकेचें निवारण होणें। सहजपणें झालें कीं ॥ ३३ ॥
घेऊं गेले साईचें दर्शन। मस्तकीं धरिले श्रीचे चरण ॥
करुनियां साष्टांग वंदन। सुख संपन्न जाहले ॥ ३४ ॥
संत कृपेचें अवलोकन। संत मुखींचें मधुरवचन ॥
संताचें तें सुहास्य वदन। कृतकल्याण भक्तगण ॥ ३५ ॥
केवळ संतांचें दर्शन। करी सकल दोषांचें क्षालन ॥
जयांसी त्यांचें नित्य संनिधान॥ काय तें पुण्य वर्णावें ॥ ३६ ॥
कां गणू कोठून आगमन॥ पुसती बाबा वर्तमान ॥
कुशल आहे ना समाधान। चित्त प्रसन्न सर्वदा ॥ ३७ ॥
गणुदास देती प्रत्युत्तर। असतां अपुलें कृपाछत्र ॥
किमर्थ व्हावें म्या खिन्नांतर। आनंदनिर्भर असें मी ॥ ३८ ॥
आपणही हें सर्व जाणतां। लोकोपचारार्थ प्रश्न करितां ॥
मीही जाणून आहे चित्ता। कुशलवृत्ता कां पुसतां॥ ३९ ॥
स्वयें मजकरवी आरंभ करविता। पुढें तो रंगारूपास येतां ॥
मध्येंच ऐसी मेख मारितां। कोणाही उकलितां उकलेना ॥ ४० ॥
ऐसें परस्पर चाललें भाषण। करीत गणुदास पादसंवाहन ॥
ईशावास्य भावार्थबंधन। संबंधें प्रश्न पूसिला ॥ ४१ ॥
ईशावास्य भावार्थबोधिनी। लिहूं जातां अडखळे लेखणी ॥
शंका कुशंका राहुती मनीं। बाबा त्या उकलूनि सांगाव्या ॥ ४२ ॥
साद्यंत घडला जो जो प्रकार। केला बाबांच्या पायीं सादर ॥
आशंका ही दुर्निवार। मांडिली समोर बाबांच्या ॥ ४३ ॥

गणुदास विनवी साईनाथा ॥ माझे ग्रंथपरिश्रम वृथा ॥
ही या ईशावास्याची कथा । आपण सर्वथा जाणतां ॥ ४४ ॥
आशंका दूर झाल्याविना । ग्रंथाचा या उकल पटेना ॥
महाराज देती आशिर्वचना । प्रसन्न मना असे तूं ॥ ४५ ॥
कायरे यांत आहे कठिण । जातां आलिया स्थळीं परतोन ॥
त्या काकाची मोलकरीण । शंका निवारण करील कीं ॥ ४६ ॥
काका ते भाऊसाहेब दीक्षित । बाबांचे एक प्रेमळ भक्त ॥
कायावाचामनें सतत । गुरुसेवानिरत सर्वदा ॥ ४७ ॥
प्रख्यात मुंबापुरी नगरी । तेथून अल्प अंतरावरी ॥
पारलें नाम ग्रामाभीतरीं । राहती हरीभाऊ हे ॥ ४८ ॥
खरें नांव तयांचें हरी । आईबापें ठेविलें घरीं ॥
जन म्हणती भाऊसाहेब जरी । बाबांचें परी तिसरेंच ॥ ४९ ॥
महाजनीस वडे काका । निमोणकरां म्हातारे काका ॥
भाऊसाहेबांस लंगडे काका । बंड्या काकाही म्हणती ते ॥ ५० ॥
आईबापें ठेविती एक । राशीचें तें असतें आणिक ॥
टोपण नांवेंहीं मारिती हाक । रीती ही अनेकपरीची ॥ ५१ ॥
महाराज ठेवितां नामें निराळीं । तीच मग चालती वेळोवेळीं ॥
जाणो तींच मग बिरुदावळी । प्रेम समेळीं धरिजेती ॥ ५२ ॥
कधीं भिक्षु कधीं काका । बाबांनीं पाडिला हाची शिक्का ॥
त्याच नामें शिरडींत लोकां । प्रसिद्ध काका जाहले ॥ ५३ ॥
आश्चर्य वाटलें गणुदासा । आश्चर्य सकळांचे मानसा ॥
काय काकांची मोलकरीण ऐसा । उलगडा कैसा करणार ॥ ५४ ॥

---

१ काका महाजनी. २ नानासाहेब निमोणकर.

मोलकरीण ती मोलकरीण। काय तीचें असावें शिक्षण ॥
ती काय ऐसी विचक्षण। वाटे विलक्षण हें सारें ॥ ५५ ॥
कोठें श्रुतींची अर्थव्युत्पत्ती। कोठें मोलकरणीची मती ॥
महाराज ही तों थट्टा करिती। जन वदती एणें परी ॥ ५६ ॥
महाराज केवळ विनोद करितां। ऐसेंच वाटलें सर्वां चित्तां ॥
परी बाबांच्या विनोदोक्ति। सत्यचि गमती गणुदासा ॥ ५७ ॥
परिसूनि त्या साईच्या बोला। साई बोलले अवलीला ॥
सकृद्दर्शनीं वाटलें जनाला। दासगणूला तें सत्य ॥ ५८ ॥
साई बोलले अवलीला। परी बोलामाजील लीला ॥
सदासर्वदा पहावयाला। आतुर झाला जनलोक ॥ ५९ ॥
असो वा नसो विनोद वाणी। कदां न ती होणें निष्कारणीं ॥
बाबांच्या एकेका अक्षरागणीं। असती खाणी अर्थाच्या ॥ ६० ॥
बाबा जें जें वाचे वदत। बोल नव्हत तें ब्रह्मलिखित ॥
एकही अक्षर न होई व्यर्थ। साधील कार्यार्थ वेळेवर ॥ ६१ ॥
ही दृढभावना दासगणूची। असो कैसीही ती इतरांची ॥
निष्ठा जेथें जैसी जयाची। फळ तयासीं तैसेंच ॥ ६२ ॥
जैसी भावना तैसें फळ। जैसा विश्वास तैसें बळ ॥
अंतःकरण जैसें प्रेमळ। बोधही निर्मळ तैसाच ॥ ६३ ॥
ज्ञानियांचा शिरोमणी। मिथ्या नव्हे तयाची वाणी ॥
निजभक्ताची पुरवावी मागणी। ब्रीद हें चरणीं बांधिलें ॥ ६४ ॥
गुरुवचन नव्हे अन्यथा। मन लावून परिसा ही कथा ॥
हरेल सकल भवव्यथा। साधनपंथा लागाल ॥ ६५ ॥
परतले गणुदास पारले ग्रामीं। काकासाहेब दीक्षिता धामीं ॥
उत्कंठा काकांची मोलकरीण कामीं। पडते कैसी मी पाहीन ॥ ६६ ॥

---

रण्याचे कामीं.

दुसरे दिवशीं प्रथम प्रहरीं । गणुदास असतां शेजेवरी ॥
सारवरझोंपेच्या आनंदाभीतरीं । तें नवलपरी वर्तली ॥ ६७ ॥

कोणी एक कुणब्याची पोरी । गात होती मंजूळ स्वरीं ॥
खोंचली ती सुंदर लकेरी । जिव्हारीं गणुदासांच्या ॥ ६८ ॥

दीर्घ आलापयुक्त तें गान । जयांत मंजूळ पदबंधन ॥
परिसोनि तल्लीन झालें मन । लक्ष देऊन ऐकती ॥ ६९ ॥

खडबडून जागे झाले । गीतार्थबोधनीं लक्ष वेधलें ॥
सावचित्तचि ऐकत राहिले । प्रसन्न झाले अभ्यंतरीं ॥ ७० ॥

म्हणती ही आहे कोणाची पोर । गातसे गंभीर आणि सुस्वर ॥
ईशावास्याचें तें कोडें थोर । उकलिलें पार कीं ईनें ॥ ७१ ॥

असो हीच ती मोलकरीण । पाहूंतरी आहे कोण ॥
जीच्या असंस्कृत वाणीमधून । श्रुत्यर्थ खूण पटविली ॥ ७२ ॥

बाहेर जाऊनि जों पाहती । खरेंच कुणब्याची पोर होती ॥
ती काकाच्या मोरीवरती । घाशीत होती बासनें ॥ ७३ ॥

शोधांतीं कळली नवलपरी । होता तेव्हां दीक्षितांचे घरीं ॥
नाम्या गडी तयांचे चाकरी । बहीण ही पोरी तयाची ॥ ७४ ॥

हीच ती काकांची मोलकरीण । गीतें या झालें शंका निवारण ॥
रेड्यामुखें वेद गायन । संतीं काय न केलें जी ॥ ७५ ॥

ऐसें तें पोरीचें गायन । झालें दासगणूचें समाधान ॥
बाबांच्या थट्टेचेंही महिमान । आलें कीं कळून सकळांतें ॥ ७६ ॥

कोणी म्हणती गणुदास । बसले होते देवपूजेस ॥
काकांचे येथें देवघरास । तदा या गीतास परिसिलें ॥ ७७ ॥

असो तें जैसें असेल तैसें । तात्पर्यार्थ एकचि असे ॥
महाराज निजभक्तां शिकविती कैसें । अनेक मिसें अवलोका ॥७८॥

ठाईंच बैसोनि मजला पुसा । उगीच कां रानोमाळ गिंवसा ॥
परी तों मी तुमचा धिंवसा । एवढा भरंवसा राखावा ॥ ७९ ॥
असें मी भरलों सर्वांठायीं । मजवीण रिता ठाव नाहीं ॥
कुठेंही कसाही प्रगटें पाहीं । भावापायीं भक्तांच्या ॥ ८० ॥
असो ती आठावरसांची पोर । कासेस एक फाटकें फटकूर ॥
परी नारंगी साडीचा वडिवार । गाई ती सुस्वर गीतांत ॥ ८१ ॥
"काय त्या साडीचा भरजर । काय त्या साडीचा कांठ सुंदर ॥
काय मौजेचा तिचा पदर" । यांतची ती चूर गातानां ॥ ८२ ॥
खायाला मिळेना पोटभर ॥ चिंधी न वेढाया बोटभर ॥
परी कोणाच्याही नारंगी साडीवर । हर्षनिर्भर ती दिसली ॥ ८३ ॥
पाहूनि तियेची दैन्य स्थिती । आणि मनाची रंगेल वृत्ती ॥
कींव उपजली गणुदासांमती । काय निवेदिती मोरेश्वरा ॥ ८४ ॥
पहा हो हीचें अंग उघडें । द्या कीं तिला एकादें लुगडें ॥
रुजू होईल ईश्वराकडे । पुण्यही घडेल तुम्हातें ॥ ८५ ॥
आधींच मोरेश्वर कृपामूर्ति । वरीं दासगणूची विनंती ॥
सुंदर साडी खरेदी करिती । आनंदें अर्पिती पोरीतें ॥ ८६ ॥
नित्य खाणारी जी कदन्न । तिला लाधावें पंचपक्वान्न ॥
तेवीं ती मुलगी सुप्रसन्न । जाहली पाहूनि ती साडी ॥ ८७ ॥
दुसरे दिसीं ती ल्याली साडी । फेरे घरी ती खेळे फुगडी ।
दिसली इतर पोरींवर कडी । मोठी आवडी साडीची ॥ ८८ ॥
तीच पुढें दुसरे दिवशीं । साडी ठेवुनी पडदणीसी ॥
गुंडाळी पूर्वील फटकुरासीं । परी ती हिरमुसी दिसेना ॥ ८९ ॥
नाहीं ल्याली, केली जोगवण । तथापि तिचें पूर्वील दैन्य ॥
गणुदासा भासे झालें विच्छिन्न । भावनेच्या भिन्नत्वें ॥ ९० ॥

१ रा. रा. मोरेश्वरराव विश्वनाथ प्रधान. २ गरगरा फिरणें.
३ सांठवणीचे सणंगांत.

नवी साडी ठेविली सदनीं। जरीं आली फाटकें नेसूनि ॥
तरी ती दिसेना खिन्न मनीं। नव्हती कीं उणीव साडीची ॥ ९१ ॥
असमर्थपणें फाटकें लेणें। समर्थपणें ही तैसेंच करणें ॥
या नांव दैन्य संपन्नपणें मिरवणें। भावनें गुणें सुखदुःख ॥ ९२ ॥
हेंच तें गणदासांचें कोडें। एणें परी जेव्हां उलगडे ॥
ईशावास्याचें केणें[1] सांपडे। ठायींच पडे अर्थबोध ॥ ९३ ॥
ईशेंच[2] आच्छादिला जेथें सारा। हा अवघा ब्रह्मांडांचा पसारा ॥
तेथें तयावीण उघडा थारा[3]। कोण विचारा मानीया ॥ ९४ ॥
तेंही[4] पूर्ण हेंही पूर्ण। पूर्णापासाव उद्भवलें पूर्ण ॥
पूर्णांतूनि काढितां पूर्ण। राहील पूर्णचि अवशेष ॥ ९५ ॥
पोरीचें दैन्य ईश्वरी अंश। फटकूर साडी हेही तदंश ॥
दाता देय दान हेंही अशेष। एकची ईश भरलेला ॥ ९६ ॥
मी माझें हें पार दवडावें। निरभिमानत्वें सदा वर्तावें ॥
त्यागपूर्वक भोग भोगावे। अभिलाषावें नच कांहीं ॥ ९७ ॥
ऐसी बाबांची अमोघ वाणी। प्रचीती मिळविली अनेकांनीं ॥
आप्राणांत शिरडी न सोडुनी। जनीं विजनीं प्रगटत ॥ ९८ ॥
कोणास मछिंद्र गडावर। कोणास कोठेंही असो शहर ॥
कोल्हापुर सोलापुर रामेश्वर। इच्छा मात्र प्रगटत ॥ ९९ ॥
कोणास अपुल्या बाह्यवेषीं। कोणास जागृतीं वा स्वप्नविशेषीं ॥
दर्शन देत अहर्निशीं। पुरवीत असोशी भक्तांची ॥ १०० ॥
ऐसे अनुभव एकना दोन। किती म्हणोन करावे वर्णन ॥
शिरडींत जरी वसतिस्थान। अलक्ष्य प्रस्थान कोठेंही ॥ १०१ ॥

---

१ गड्डा. २ ईश्वरानेंच. ३ स्थळ. ४ ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्ण-मुदच्यते ॥ पूर्णस्य पूर्णमादाय पूर्ण मेवावशिष्यते ॥

पहा ही पोर कोणाची कोण । यःकश्चित गरीब मोलकरीण ॥
नारंगी साडीवर तिचें तें गायन । निघालें मुखांतूनि साहजिक॥१०२॥
शंका म्हणून बाबांस पुसावी । या मोलकरिणीनें ती निरसावी ॥
तीही काकांच्या इथें असावी । रचना ही मायावी नाहींका ॥ १०३ ॥
आधीं ही तेथें मोलकरीण । असावी हें कैसें बाबांस ज्ञान ॥
तीही भविष्यकाळीं हें गाऊन । श्रुत्यर्थ बोधन व्हावें कसें ॥ १०४ ॥
परी तें झालें झालें खास । वाटलें आश्चर्य गणु दासांस ॥
आशंकेचा झाला निरास । ईशावास्य आकळलें ॥ १०५ ॥
श्रोतियां मनीं येईल शंका । खटाटोप हा तरी कां इतुका ॥
स्वयेंच स्वमुखें बाबांनींच कां । फेडिली न आशंका तेथेंच ॥ १०६ ॥
हें काय जागींच नसतें करवलें । परी ते नसतें महिमान कळलें ॥
ईशें त्या पोरीसही आच्छादिलें । प्रकट हें केलें बाबांनीं ॥ १०७ ॥

आत्मयाथात्म्य निरूपण । हेंच सर्वोपनिषदांचें पर्यवसान ॥
हेंच मोक्षधर्म निष्कर्षण । गीतार्थ प्रवचन तें हेंच ॥ १०८ ॥
प्राणी भिन्न आत्मा अभिन्न । आत्मा कर्तृत्व भोक्तृत्वहीन ॥
तो न अशुद्ध पापपुण्याधीन । कर्माचरण त्या नाहीं ॥ १०९ ॥
मी जातीनें उच्च ब्राह्मण । इतर मजहून नीचवर्ण ॥
तसें ऐसें जों भेदज्ञान । कर्माचरण आवश्यक ॥ ११० ॥
मी अशरीर सर्वत्र एक । मजहून कोणी नाहीं आणिक ॥
मीच कीं सकलांचा व्यापक । स्वरूपोन्मुख हें ज्ञान ॥ १११ ॥
पूर्णब्रम्हस्वरूपच्युत । ऐसा हा जीवात्मा पूर्ववत ॥
कधीं तरी स्वस्वरूपाप्रत । पावावा निश्चित हें ध्येय ॥ ११२ ॥
श्रुती स्मृति आणि वेदांत । या सर्वांचा हाचि सिद्धांत ॥
हेंचि अंतिम साध्य निश्चित । च्युतासि अच्युतपद प्राप्ति ॥ ११३ ॥

समं सर्वेषु भूतेषु । जोंवरि अभ्यास हा स्थिति विशेष ॥
तोंवरी न भूतात्मा हृषीकेशु । ज्ञानप्रकाशा समर्थ ॥ ११४ ॥
विहितकर्में चित्त शुद्ध । होतां होईल अभेद बोध ॥
शोक मोहादि संसृति विरुद्ध । प्रकटेच सिद्ध ज्ञान तें ॥ ११५ ॥
अखिल त्रैलोक्य सचराचर । आच्छादी जो ईश परमेश्वर ॥
निष्क्रिय निष्कल जो परात्पर । तो अशरीर सदात्मक ॥ ११६ ॥
नामरूपात्मक हें विश्व । सबाह्य आच्छादी हा ईश ॥
तो मीच मी भरलों अशेष । निर्विशेष रूपत्वें ॥ ११७ ॥
अस्तु वस्तुतः जे निराकार । मायागुणें भासे साकार ॥
कामुकापाठीं हा संसार । तोचि असार निष्कामा ॥ ११८ ॥
हें यत्किंचित भूतभौतिक । जगत चेतनाचेतनात्मक ॥
ईश्वरचि हा अद्वितीय एक ॥ निर्धार निःशंक करावा ॥ ११९ ॥
जगद्बुद्धीचा हा विवेक । जरी मनासी पटेना देख ॥
तरी हे धनहिरण्यादिक । यांचा अभिलाख न करावा ॥ १२० ॥
हेंही जरी न घडे तरी । जाणावें आपण कर्माधिकारी ॥
आमरणांत शतसंवत्सरीं । कर्मचि करीत रहावें ॥ १२१ ॥
तेंही स्ववर्णाश्रमोचित । यथोक्तानुष्ठानसहित ॥
अग्निहोत्रादि नित्यविहित । चित्त अकलंकित होईतों ॥ १२२ ॥
हा एक चित्तशुद्धीचा मार्ग । दुजा सर्वसंग परित्याग ॥
हे न आक्रमितां ज्ञानयोग । कर्मभोगचि केवळ ॥ १२३ ॥
ही ब्रह्मविद्या हें उपनिषद । सर्वां न देती अधिकारविद[1] ॥
वृत्ति न जोंवर झाली अभेद । उपनिषद्बोध शाब्दिक ॥ १२४ ॥
तरी तोही व्हावा लागे । जिज्ञासू आधीं तोच मागे ॥
म्हणोन बाबांही पाठविलें मागें । मोलकरीण सांगेल म्हणोनि ॥१२५॥

---
१ कोणाचा अधिकार काय आहे हें जाणणारे.

स्वयेंच बाबा हा बोध देते । तरी हें पुढील कार्य न घडतें ॥
एकमेवाद्वितीय नसतें । ज्ञान हें कळतें बाबांचें ॥ १२६ ॥
मजवांचून आणीक कोण । आहे जी काकांची मोलकरीण ॥
मीच ती ही दिधली खूण । ईशावास्य जाणविलें ॥ १२७ ॥
परमेश्वरानुग्रह लेश । आचार्यानुग्रह विशेष ॥
नसतां न आत्मज्ञानीं प्रवेश । सिद्धोपदेशचि आवश्यक ॥ १२८ ॥
आत्मप्रतिपादक जें जें शास्त्र । श्रवणीं आणावें तें तेंच मात्र ॥
प्रतिपाद्य जेतें मीच सर्वत्र । मजवीण अन्यत्र कांहींच न ॥ १२९ ॥
होतां आत्मतत्त्वाचें विवरण । तोच मी आत्मा नव्हे आन ॥
हें जयासीं अभेदानुसंधान । आत्माही प्रसन्न तयासिच ॥ १३० ॥
असो आत्मनिरूपण होतां । ऐसेंच आत्मानुसंधान राखितां ॥
ऐसीच निश्चल धरितां आत्मता । परमात्मा हातां येईल ॥ १३१ ॥
पुढील अध्याय कथानुसंधान । विनायक[1] ठाकुरादि कथा कथन ॥
श्रोते करोत सादर श्रवण । परमार्थ प्रवण होतील ॥ १३२ ॥
त्याही कथा ऐशाच गोड । ऐकतां पुरेल श्रोतियांचें कोड ॥
महापुरुष दर्शनाची होड । पुरेल चाड भक्तांची ॥ १३३ ॥
जैसा उगवतां दिनमणी । अंधार जाय निरसोनी ॥
तैवीं या कथा पीयूषपानीं[2] । माया हरपोनि जातसे ॥ १३४ ॥
अतर्क्य साईचें विंद्रान । त्यावीण कोण करील कथन ॥
मी तो एक निमित्त करून । तेचि तें वदवून घेतील ॥ १३५ ॥

स्वस्ति श्री संतसज्जन प्रेरितें । भक्त हेमाडपंत विरचितें ॥
श्रीसाईसमर्थ सच्चरितें । ईशावास्याभावार्थ
बोधनं नाम विंशोऽध्याय गोड हा ॥

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ॥

---

१ रा. रा. विनायक हरिश्चंद्र ठाकूर B. A. इत्यादिकांच्या २ कथामृत.

[illegible]

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष २ रें.] भाद्रपद शके १८४६ [अंक ६ वा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

९८

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| महाराजांचे अनुभव ... ... ... | १९९-२२४ |
| स्फुट विषय ... ... ... ... | १२५-१३६ |
| श्री साईसच्चरित ... ... ... | ३५७-३६८ |


---

## सालमजकुरीं श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथी निमित्त शिर्डी येथील कार्यक्रम खालीलप्रमाणें ठरला आहे.

आश्विन शुद्ध १० मंगळवार

| | | |
|---|---|---|
| (१) रुद्राभिषेक | सकाळीं ८ ते १० | वाजेपर्यंत |
| (२) कीर्तन | दुपारचे १२ ते २ | वाजेपर्यंत |
| (३) आराधन विधि | दुपारी २ | वाजतां |
| (४) ब्राह्मण भोजन | ,, ३ | वाजतां |
| (५) पुराण | सायंकाळीं ५ | वाजतां |
| (६) रथाची मिरवणूक | रात्रीं ९ | ,, |

आश्विन शुद्ध ११ बुधवार

| | | |
|---|---|---|
| (१) भंडारा | | |
| (२) मशिदींत कीर्तन | सायंकाळीं ६ | वाजतां |
| (३) पालखी चावडींत नेणें | रात्रीं ९ | वाजतां |

आश्विन शु॥ १२ गुरुवार

काला सकाळीं ९ वाजतां

सदहू कार्यासाठीं कोणास कांहीं पाठवावयाचें असल्यास तें रा. रा. रामचंद्रदादा पाटील कोते, मुक्काम शिर्डी, पोस्ट राहातें या पत्त्यावर अथवा रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोळकर ५ सेंट मार्टिन्स रोड वांद्रे या पत्त्यावर पाठवावें.

(पृ. १९४ वरून पुढे चालू.)

आणलीका. होय बरें आता २।४ रोज राहणार का जाणार. मी म्हटलें आपण ठेवाल तितके दिवस राहूं, मग जाऊं. त्यावर बाबा म्हणाले बरें आतां दक्षिणा दे आणखीं मग पाहून घेऊं. इतक्यांत आर्ती सुरू झाली. मग आर्ती आटोपली व सर्वत्रांना उदो दिली व मला म्हणाले "पहा भडवा आला चेवला त्याला तळमळ लागली." असो. मग सर्वत्रांना वाडयांत जाण्याची परवानगी मिळाली. आम्हीं सर्वजण जाऊन जेवण्याची तयारी करतों तोंच श्री राधाकृष्णा आईनें अगोदरच तजवीज लावून ठेवली होतींच. त्यांनीं आम्हांला म्हटलें कीं आतां जेऊन घ्या व नंतर झाडांची व्यवस्था तुझ्या आईला विचारून करून घे. नाहीं तर झाडें व कुंडया सुकून जातील. मग आम्हीं जेवून नंतर मी श्रीकडेस जाऊन श्रीला परवानगी विचारणार इतक्यांत श्रीनें नारसिंह अवतार धारण केला होता. मी सभामंडपांत उभा राहिलों. सुमारें पाऊण तासानें वर जाऊन चरणीं मस्तक ठेऊन विचारलें कीं बाबा झाडें आणिलीं आहेत तीं लावूं का आतां? ती मी चावडीपासून साठयांच्या वाडयांपर्यंत दोनी बाजूनें वेली लावाव्या म्हणजे बरें होईल व मग लेंडीवरील कमानीवरहीं कांहीं वेली लावून तेथें थोडा बागही करावा असें माझे मनांत पुष्कळ दिवस होतें. कारण येथें फुलांचा फार अभाव असतो, परंत आपल्या कृपेनें पुष्कळच रोपे चांगले सुवासिक मिळाले आहेत. तरीं तेवढीं आपण माझी अनाथाची इच्छा पूर्ण करून लावण्यास आज्ञा द्यावी व तीं चांगल्या रीतीनें वाढवून त्याला लवकरच फुलें येउंद्या इतकींच आपल्या चरणापाशीं माझी गरीबाची प्रार्थना आहे. त्यावर बाबा मला म्हणाले "मला झाडबिड कांहीं लागत नाहीं तूं आपल्या घरीं चांगला बाग कर व तुझ्या रांडेला फुलें देत जा." सारांश मजवर फारच रागावून उठले व म्हणाले माझ्या अंगावर माणसें घालतो. चावडी खांडली. मशीदही खांडून गुलामानें सर्व पैका नेला. आणि मला बागाच्या गोष्टी सांगतो. याद राख माझी बरोबरी करू नकोस तुला गावाबाहेर हाकून देतों आणि तुझ्या रांडेला पोरासोरासुद्धां हाकून देतों. रातदीसा माझ्या पाठी लागतो. मी तुझ्या बापाचें काय खाल्लें आहे. मला धड कोणी कोरभर

भाकरबी देत नाहीं. असो कोणी दील वा न दील वा. अल्ला है. मी म्हटलें बाबा झाडें सुकून चाललीं. त्यावर बाबा म्हणाले फेकून दे. व मग त्याचे तिसरे दिवशीं रात्रीं सुमारें ८–८॥ च्या सुमारास मला महादूस बोलाव् पाठविलें. व यावेळीं मी श्री राधाकृष्णाआईकडेस होतों. महादू आला व मला बोलला पुरंदरे तुम्हांला बाबा बोलावितात. मीं म्हणालों सकाळीं येईन. आतां रात्रीचें कोणी मशिदींत जात नाहीं मग मी कशाला येऊं. तो परत जाऊन त्यानें श्रीस तसें सांगितलें. त्यावर श्री म्हणाले जाय. त्याला गांडींत हात घालून घेउन ये. त्यानें पुन्हा येउन मला सांगितलेला निरोप दिला. त्यावर श्री राधाकृष्णा आई म्हणाल्या जाग ताई तूं असें काय करतेस. तुझ्याकरितां तुझी आई सारखी रात्रंदिवस तळमळत असते आणि तुला रागावतात त्याचें काय वाईट वाटतें. तूं रडूं नकोस. तुझी आई तुझीं झाडें मरुं देणार नाहीं. जरी सुकून गेलीं तरीं ती देखील रुजवून तूंच त्या सर्व वेलींचीं फुले पाहशील व सर्वत्रांना तुझी आठवण कायम राहील. जा तूं नको म्हणूं नकोस. एवढया रात्रींस तुला बोलावलें आहे तेव्हां कांहीं तरी चांगलेंच आहे जा. मी जाऊन पायरीखालीं उभा राहिलों. त्यावेळीं रा. रा. दादासाहेब केळकर बसलेले होतेच त्यावेळीं बाबा म्हणाले ये, भाऊ वर ये रडूं नकोस. मीं काय तुझें केले तूं माझ्या पाठीस कां लागतोस ये. मी तुला काय कमी केलें आहे. तुला मस्त देईन. अल्ला तुला सात समुद्र भरून देईल. भितोस कशाला. बाबा मला आपली कृपा आहे, तेवढी बस आहे. परंतु आपण जी मी झाडें आणलीं ती पार सुकून गेली तरी लावण्यास परवानगी देत नाहीं. मग मला जगून तरी काय करावयाचें आहे. ती आतां मी काय माझ्या मढयावर घालूं. त्यावेळीं मला फारच रडूं आलें. त्यावेळीं श्री म्हणाले भाऊ ये वर ये रडूं नकोस. अल्ला है. असें म्हणून श्री उठून मजकडेस येऊं लागले. त्यावेळीं मी वर उठून श्रीचरणीं मस्तक ठेविलें. मला फारच रडूं आलें. त्यावेळीं श्रीनें वरदहस्त शिरीं ठेऊन म्हटलें असा रडूं नकोस मी रातदीन तुझी घोकणी करतों आन तूं रडतोस कशाला. रडूं नये; जाय आतांच्या आतां सर्व झाडें लावून टाक आणि माती त्या वडाखालची आण, म्हणजे

सर्व झाडें लागतील. ती माती फारच चांगली आहे. ( हा वड त्या पाटलाच्या खळ्याकडेस आहे. ) असें म्हणून मला वर नेऊन बसविलें व बरेच रस्ताळूं लागले व बोधही केला कीं असें रडूं नये. झाडें मरतात काय. मेलीं तरीं जगवीन. तीं सर्वे येतील. भितोस कशाला. तुझी इच्छा पुरेल अल्ला है हं. जाय आतां उदी घे उशिर करूं नको. सकाळीं झाडें लागायचीं नाहीं वर का. असें म्हणून भाळीं उदी लावून मस्तकीं वरदहस्त ठेविला. जा अल्ला हैं तुझी निष्टा चांगली आहे. अल्ला वाली है. अल्लासे कोई नहीं. मग मलाही आनंद वाटून मी जरा हसलों. त्याबरोबर तेही हंसले व जाय अल्ला हैं. मग मी सर्व हकिगत श्री राधाकृष्णाआईस सांगितली. त्यांनी वाहवा चांगलें आहे असें म्हटलें व तुझी आई तुझ्याकरितां कशी तळमळते ती पहा म्हणाल्या. वर आतां आपण दोघेजण माती खांडून आणून तात्या मोरेश्वर दामाजी मास्तर ह्यांनीं खड्डे खोदावे व त्यांना आणखीं माणसें देऊं म्हणजे खाडे लवकर तयार होतील व आपण दोघांनी माती वाह्यांची. ह्याप्रमाणें श्री राधाकृष्णा आई म्हणाल्या व त्या व मी मिळून माती आणली व बाकीच्या मंडळीनीं खड्डे खोदले व मग झाडें लावलीं तों श्रीच्या काकडयाची वेळ झाली. मग आम्ही सर्वांनीं स्नानें करून काकडयास गेलों. तो श्री फारच रागांत होते. पुढें लेंडीवरील बाग व कमानीवरील वेली आटोपून श्री लेंडीवर गेले तेथून परत आल्यावर झाडें उपटून टाकण्यास श्रीनें कोंडाजी वगैरेस सांगितलें व फारच रागावून शिव्यागाळ्यांचा वर्षाव मोठ्या जोरानें सुरू झाला. त्यावेळीं झाडें उपटून टाकावीं अशी श्रीची आज्ञा ऐकून माझें मन फारच गहिवरून आलें व मी मग श्रीराधाकृष्णा आईच्या ओटीवरच बसलों व कांहीं सुचेनासें झालें. परंतु श्रीचा राग झाडें उपटण्यापर्यंत गेला नाहीं. लेंडीवरीलहीं तसींच राहिली. व मग २।३ दिवस मला मात्र जवळ येऊं दिलें नाहीं व ४ थ्यां दिवशीं माळीं स्वतः ठेऊन शिंपण्याची व चांगली आळीं घालण्याकरितां मनुष्य स्वतः ठेविला व त्यांच्या कृपेनें त्या सर्व वेलीं अझून चांगल्या रूजून आजपर्यंत श्रीला फुलें व हार नित्य मिळत आहेती

माझें कपाळाची व आंगाची अगदीं आग झाली आहे उठा बाबा उशापाशी उभे आहेत. आतां तुम्ही घाबरू नका. मी बरी होईन; मरत नाहीं व कोठें जाणारही नाहीं व तेंच मला श्रींनींही म्हटलें. परंतु ठरल्याप्रमाणें रा. रा. दाभोळकर रा. रा. काकासाहेब दिक्षीत वगैरे मंडळी सकाळींच आली. ते मला म्हणाले चला तयारी करा. त्यावर मी त्यांना वरील सर्व प्रकार सांगितला. रा. रा. दाभोळकर हे तें मानीनात, परंतु रा. रा. दिक्षितांच्या म्हणण्यावर ते स्वस्थ राहिले. त्या मुलाचें बारसेंही झालें नव्हतें. मग माझें कुटुंब साधारण बरें झाल्यावर त्यांना श्रीसमर्थ दर्शनास घेऊन जाणार परंतु तें फारच अशक्त झाल्यामुळें त्यांच्या आईचा विचार त्यांच्या येथें नाताळच्या संधीला घेऊन जाण्याचा ठरला व श्रीसमर्थांनी वरप्रमाणें धीर दिल्यापासून त्यांना गूण येत चालला तो कायमचा आला. पुढें नाताळच्या सुटींत त्यांना तेथें नेऊन पोहोंचविण्याबद्दल मी घराहून निघालों तों सर्व मंडळीसह वांद्रें स्टेशनवर आलों तों तिकिटा वगैरे सर्वांच्या काढल्या व पुढें गाडीला सुमारें २० मिनीटें असतां माझें मन फिरलें तें असें. मला वाटलें कीं मी शिरडीस जावें. मंडळीनेंही तेथेंच जावें; परंतु आमच्या मातोश्रीनें मला सांगितलें कीं आम्हाला पोंहचव आणि मग तूं जा. माझें मन कांहीं राहीना. मी म्हटलें कीं तुम्हीं जा. मी असाच गाडींत बसून शिरडीस जाणार. मग गाडी आल्यावर त्यांना गाडींत बसवून मी शिरडीस आलों. ह्यावेळीं श्रीसमर्थ व राधाकृष्णा आई हीं फारच सीक होती. मी कोपरगांवीं गेल्यावर हसन टांगेवाल्यानें मला ही हकीगत सांगितली. मी त्याला तांगा एकदम शिरडीस जलद घेऊन जाण्याबद्दल सांगून, आम्हीं सुमारें ८॥।–९ च्या सुमारास तेथें गेलों. वेशीपाशीं गेल्यावर श्रीच्या दम्याचा आवाज व कण्हणें मी ऐकिलें. तसाच मी श्रीचरणांपाशीं गेलों. सर्वत्र मंडळी बसलेली होतीच. मी पायरी चढून गेल्यावर मजकडे पाहून भाऊ आलास. मी फार हैराण आहें आतां मला सोडून जाऊं नकोस. मी आज ३।४ रोज तुझी वाट पहातों. काकालाबी म्हटलें वर जा त्या रामकृष्णीकडे तिथेंच राहा, कोठें जाऊं येऊं नको. मी तेथें गेलों तो त्याही अत्यावस्थ सीक. त्यावेळीं श्री अगदीं

ही त्यांची खरी कृपा आहे. कारण रोप कोंवळें असून फारच सुकून गेलें होते व रुजणें शक्य नव्हतेंच ते सर्व आज तागाईत शाबूत आहेत.

सन १९१६ सालच्या श्रावण महिन्यांत आमचे कुटुंब आपल्या माहेरी प्रसूत होऊन मुलगा झाला. त्याचे आधीं तेथें शिरगांव ता. माहिम जिल्हा ठाणें येथें प्लेगाची धामधूम होती, करितां त्यांचे वडीलांनीं दुसऱ्या ठिकाणीं जागेची व्यवस्था केली. परंतु ती व्यवस्था लागण्याचे अगोदरच माझें कुटुंब त्यांच्या घरींच प्रसूत झालें. व त्या मुलाच्या आंगावर सर्व लांबलांब केस होते नखेंही फारच मोठीं असून वळालेलीं होतीं. ह्या मुलाच्या वेळीं कुटुंब प्रसूत होऊन चवदावे दिवशीं भर पावसांत घरीं म्हणजे वांद्याला निघून आलें. त्यावेळीं त्यांच्या वडिलांनीं त्यांना वांद्रास न जाण्याबद्दल पुष्कळ सांगितले, कारण त्यावेळीं त्यांनां थोडेंसें वायूचें चिन्ह दिसत होतें. परंतु त्यांनी तें न जुमानून वांद्रास निघून आल्या व दुसऱ्या दिवशींच त्यांना वायूचें मान जास्त होऊन जीभ दातांखालीं येऊं लागली. मी तसाच वांद्र्याचे असिस्टंट सर्जन डॉ. खांडवाले याला आणून तिला दाखविलें. तेही फार घाबरले व चिन्ह ठीक नाहीं असें म्हणाले. अस्तु दवापाणी चालू केलें तरी फरक नाहीं. मला त्यांनीं त्यांच्या दवाखान्यांत तिला ठेवण्याबद्दल पुष्कळ आग्रह केला परंतु मी मानलें नाहीं, कारण श्री समर्थ आज्ञा तेथेंच रहाण्याबद्दल होती. मग त्यांनीं रा. रा. दाभोळकरांना सांगून ते व रा. रा. आ. न. जोशी वगैरे माझ्या घरीं येऊन मला व मातोश्रीला बराच आग्रह करून शेवटीं तेथें नेण्याचें ठरऊन सकाळीं आम्हीं पालखी वगैरे आणून घेऊन जाऊं आपण कांहीं काळजी करू नये असें त्यांनीं म्हटलें व त्यांच्या सर्वांच्या समाधानाकरिता मला हो म्हणावें लागलें. परंतु श्रीलीला अगाध. त्यांनीं आमची सर्व तयारी झालेली पाहून रात्रीस सुमारें १२ च्या सुमारास हातांत सटका झोळी वगैरे घेऊन दरवाज्यावर धक्का मारून आंत आले असा मला भास झाला. ते अगदी नरसिंह अवतार धारण करून आले. ते मला मारायला येऊन नित्याची पुष्पवृष्टी बरीच केली, व तसेंच आंत जाऊन सौ. वतीस गरमगरम उदी लावली. त्यावेळीं त्या मोठ्यानें ओरडून उठल्या. माझे कपाळांस श्री बाबांनी गरमगरम उदी लावली त्यामुळें

अशक्त होऊन गेले होते. खाणें वगैरे कांहींच चालत नसे, परंतु त्यांच्या इतर नित्यक्रमांत कांहींही कमी झालेलें नव्हतें. २।३ मनुष्यांनीं त्यांना धरून चालवावें. त्यांचा भिक्षेचा वगैरे नियम चालूच होता. एके दिवशी लेंडीवर जातांना मी म्हटलें कीं बाबा तुम्हाला उचलून नेतो व असें म्हणतांच मला रडें आलें. त्यावेळीं श्री म्हणाले कीं रडूं नकोस. मी २।४ रोजानीं बरा होईन. अल्लामियांनीं दुखणें घातलें आहे ते भोगीलें पाहिजे. जा रडूं नकोस रडावें कशाला दोन दिवस बरेवाईट येतातच. भिऊं नयें. त्यांना मी व रा. रा. काकासाहेब दिक्षित वगैरे श्रीराधाकृष्णा आईच्या औषधाबद्दल विचारलें. २।३ दिवसांनीं बरी होईल ती असें म्हणाले. शेवटीं एके दिवशीं सकाळीं मी त्यांची भयंकर स्थिति पाहून रडतच श्रीकडेस गेलों व आज आई जगत नाहीं. कांहींतरी औषध द्या मी घेतल्यावांचून जाणार नाहीं असें म्हटलें. मग मजवर रागावून मला त्यांनीं औषध सांगितलें तें मी त्यांना तयार करून दिलें. व त्याच दिवशीं दोन प्रहरीं श्रीगोंदेकराच्या घरावर चढले. ते स्वतः इतके सीक होते कीं त्यांना २।३ जणांनीं उठवावें व बसवावें लागत असे. तरी ते एकटे एकाएकीं गोंदकराच्या घरावरून श्री राधाकृष्णा आईच्या घरावर चढून आले. सर्वत्र मंडळी ती मौज पहात राहिली. व मग तेथून वाण्याच्या बाजूनें खाली उतरवा म्हणून बोलूं लागले. त्यावेळीं रा. रा. तात्यासाहेब पाटील वगैरे बरीच मंडळी होती. त्यांना मला खालीं उतरावा. असें म्हणाले तात्या म्हणाले काय द्याल. त्यावेळीं बाबा म्हणाले १० रुपये देईन मला खालती उतरावा. वर चढण्याचें कारण माझ्या आंगावर माणसें घालून मारण्यास आलीं म्हणून मी घाबरून वर चढलों. ह्याप्रमाणें श्री लीला करीत होते. मग मला दिसेंबर २५ तारखे पासून ते जानेवारीच्या १४ तारखेपर्यंत मी बिनरजेनें असतां पुढें कामावर रूजू झालों. मी हैराण आहे मला सोडून जाऊं नकोस व तूंही भिऊ नकोस अल्ला है अल्लासे कोय नहीं असें मला बाबा बोलले होते. परंतु मला सर्व भर पगार मिळून कांही एक बोभाट झाला नाहीं. पुढें सौ. वती बरी होऊन आल्यावर आम्हीं सर्वजण त्या मुलासह ( विठू ) शिरडीस दर्शनास गेलों. त्यावेळीं श्री म्हणाले हा भाऊ मला लय दिवस शोधीत होता वरं कां ?

परंतु शेवटीं त्याने मला शोधून काढलें. त्यावेळीं तो व श्री दोघे हसूं लागले. ह्यावेळीं मुलगा सुमारें ६।७ महिन्याचा होता व तो मुलगा मूळ नक्षत्रावर झालेला होता व मला शांती करण्याबद्दल पुष्कळांनीं सांगितलें परंतु मी ऐकिलें नाहीं. शेवटीं ही तक्रार के. रा. दा. घ. बाबरे यांनीं श्रीस सांगितलें कीं हा कोणाचें ऐकत नाहीं तर ह्याला शांती करण्यास सांगा. श्री म्हणाले अण्णा मी असतां त्यानें काय म्हणून शांती करावी. त्याला जिकडे तिकडे साईमौला दिसतो. तो वेडा आहे. असो गरीबोका वाली अल्ला है. व त्याच दिवशीं त्या मुलाला श्रीराधाकृष्णा आईनें पुष्कळ तेल वगैरे लाऊन आंघोळ घालून पाळण्यांत घातला. तो मुलगा आज तागायत श्री कृपेनें आनंदांत आहे. अशा श्रीच्या लीला अनेक आहेत. त्या मी मूर्खानें काय व किती म्हणून वर्णन कराव्या. त्या सांग वर्णन करणें शक्य नाहीं. अस्तु श्रीनें मला असे पुष्कळ अनुभव दिले आहेत व अजूनही देतात. ते वर्णन करून घेणें त्यांची सत्ता आहे. ह्यापुढें ते जेव्हां आज्ञा देतील त्यावेळेस मी केव्हांही ते वर्णन करावयास तयार आहें.

माझें घर श्रीनेंच बांधलें नाहीं तर मी फाटका माणूस घर बांधू शकलों नसतों. असो पुढें दुसरें वर्षी एकाएकीं घरास थोडी फाट गेली. त्यावेळींही मी श्रीची आज्ञा ती भरून काढण्याबद्दल पुष्कळदा मागितली, तरी श्रीनें राहूदे म्हणून मला सांगावें व मी माझें घर दुरुस्त करणार असून तुला त्याची काळजी नको राहूदे असें म्हणाले. पुढें ३।४ वर्षांनीं ती फाट वरीच मोठी होऊन दक्षिण अंगाची भिंतीवर अगदीं पडण्यासारखी होऊन आणखी २।३ ठिकाणीं दुसऱ्या फाटा होऊन घराची स्थिति अगदीं भयंकर झाली व पुष्कळजणांनीं मला या घरांत राहूं नकोस म्हणून सांगितलें. तरी देखील श्रीसमर्थांच्या आज्ञेमुळें आम्ही घर सोडलें नाहीं. मात्र एकदां माझे बंधू रा. रा. आ. न. जोशी हे आपल्या कुटुंबास श्रीदर्शनास जात होते त्यावेळीं माझ्या मनांत भीती उत्पन्न होऊन दुरुस्तीबद्दल श्रीनां तुम्हीच विचारा, कारण आपण सर्व व्यवस्था पाहिली आहे करितां कसेंही करून आपण श्रीची परवानगी

घेऊन या; नाहींतर आतां भिंत उभी राहणें शक्य नाहीं. असे श्रीला कळविलें, तरी देखील श्रीनें परवानगी दिली नाहीं. अस्तु तरी ते आल्यावर मी तें दुरुस्त करावें म्हणून चुन्याची घाणी चालविली व चाक बरोबर फिरते कीं नाहीं हें पाहूं लागलों! तरी त्यावेळीं नुसतें चाक लोटून पहात असत. तें फुटले व त्यावर दुसरें आणलें तें ही फुटलें. त्यावेळी माझ्या मातोश्रीनें सांगितले कीं खरोखर तुला श्रीची आज्ञा नाहीं तर काम राहूंदे. आता तसेंच त्यांना जें करणें असेल तें करूदे. कारण हें दुरुस्तीचे काम करूं नये म्हणून त्यांचा फारच आग्रह होता. अस्तु पुढें आमच्या मातोश्रीस श्रीनें आपल्या चरणीं नेलें व श्रीरामनवमीच्या दिवशीं (१९२० ची) श्रीनें आमच्या कुटुंबासही आपल्या चरणीं नेलें. तें असें कीं श्रीच्या रामनवमीच्या उरुसास ८ दिवस होते व दिवस रविवार होता, तरी त्यांनीं मला विचारिलें कीं उरुसास किती दिवस आहेत. मी म्हटलें की पुढल्या रविवारीं. त्यावेळेस त्यानां अतिशय वाईट वाटून त्या रडूं लागल्या व श्रीस म्हणाल्या कीं मला आज तागायत आपण प्रत्येक उत्सवास आपल्या चरणीं घेऊन गेला आणि ह्यावेळीं मला येथें दुखण्यांत पाडून ठेविलें आहे तरीं जर आपण मला उरुसास नेलें नाहीं तर मी आपल्या समाधीपाशीं प्राण देईन. हा देह ठेवणार नाहीं. करितां मला उरसास घेऊन चला नाहीं तर मी माझा शब्द परत घेणार नाहीं. त्यावेळीं मी त्यांची बरीच समजूत केली तरी त्यांचें समाधान झालें नाहीं. त्या रडत राहिल्या. मग त्या दिवशीं श्री रात्रीस त्यांच्या स्वप्नांत येऊन त्यांचें समाधान केलें कीं तूं रडूं नकोस व विनाकारण माझ्या भाऊला व पोरासोरांना वाईट वाटेल असें करूं नकोस व बोलू नकोस वर, मी तुला उरूसास जरूर नेईन उगी रहा. मग सकाळीं आपण होऊन मला हा सर्व प्रकार सांगितला व मी आतां मरत नाहीं व आपण उरूसास खास जाणार असे म्हणाल्या. अस्तु ह्याप्रमाणें श्रीनीं त्यांना उरूसाचेच दिवशीं आपल्या चरणीं नेलें तें असें कीं त्यानीं मला प्राणोत्क्रमणाच्या अगोदर १५।२० मिनिटे सांगितले कीं चला तयारी करा. तुम्ही जेवून घ्या. बाबा आले. आपण लवकर निघा माझी तयारी आहे. व त्याप्रमाणें त्यानीं श्रीच्या फोटोकडेस लक्ष

एक सारखें लाऊन मोठ्यामोठ्यानें श्रीस ओरडू लागल्या व तेथेंच टक लावून पाहूं लागल्या. त्यावेळेस मला जरा दुश्चिन्ह दिसलें म्हणून मी विचारलें की तुला कांहीं धर्म वगैरे करावयाचा आहे काय ते सांग. त्यांनी मला हात जोडले व म्हणाल्या कीं माझें कांहीं नाहीं. जे काय तुम्हाला करणे असेल ते माझे श्रीचरणीं करा. येथें कांहीं करूं नका ह्याप्रमाणे त्यांनी मला नमस्कार करून श्रीकडेस ध्यान धरून त्या त्यांच्या चरणीं गेल्या. अस्तु ह्याप्रमाणें श्रीची अगाध लीला आहे. अस्तु आतां ह्यापुढें मला जास्त लिहवत नाहीं. मी श्रीची रात्रंदिवस विनंती करितो कीं त्यांनी मलाही आपल्या वचनाप्रमाणें मशिदींत हातानें गाडण्याची वेळ लवकरच आणावी. व ह्याप्रमाणें गेल्या वर्षी माझा लहान मुलगाहो श्रीचरणीं तो रामनवमीचें उत्सास जाऊन आल्यावर मे १९२३ च्या ३१ तारखेस श्रीनें आपल्या चरणीं नेला. अस्तुः

(१२०)

एकदां ह. भ. प. बाबूरावबुवा औरंगाबादकर महाराजांचे दर्शनास आले होते. महाराजांनीं त्यांना कांहीं दिवस ठेऊन घेतलें. शेवटीं एके दिवशीं त्यांनीं जाण्याचा हट्टच घेतला. ते ज्यांचे घरीं उतरले होते त्यांनीं महाराजांस सांगितलें " आज बुवांनीं जाण्याचा निश्चय केला आहे आणि त्याप्रमाणें ते आतां निघणार आहेत. " महाराज म्हणाले " त्याची मर्जी. गेला तर पावसांत हैराण होईल. आपलें काय जातें. " ते निघाले त्यावेळीं लख्ख ऊन पडलें होतें आणि पावसाचें कांहींही चिन्ह नव्हतें. अर्थातच " पावसांत हैराण होईल " हे महाराजाचे शब्द त्यांना विनोदाचे वाटले. पण त्यांचा तांगा अर्धा मैल गेला असेल नसेल तोंच एकदम आकाश अभ्राच्छादित झालें आणि अति जोराचा पाऊस आला. त्यांचे सगळे कपडे भिजले आणि त्यांना अत्यंत त्रास झाला. शेवटीं त्याना जवळच एका खेडयांत रात्रीं मुक्काम करावा लागला.

(१२१)

असेंच एकदा तात्या पाटील आणखी कांहीं मंडळी नगरगांवास जाण्यासाठीं निघाली. जातांना महाराजांचें दर्शनासाठीं गेले. तेव्हां महाराजांनीं

विचारलें " कोठे जातां. " ते म्हणाले " कोपरगांवास जातो. " महाराज म्हणाले "कशाला हात पाय मोडून घ्यावयाला जातां ?" त्यावर तात्या पाटील म्हणाले "बाबा जरुरीचें काम आहे गेलें पाहिजे" असें म्हणून महाराजांच्या उत्तराची वाट न पाहतां तावडतोब निघून गेले. ते शिवेच्या ओढयापर्यंत म्हणजे साधारण अर्धा मैल गेले. ओढयापाशीं टांग्याचे घोडे बुजाले आणि टांगा उलटला व मोडला. सर्व मंडळीला थोडी बहुत दुखापत झाली.

( १२२ )

एकदा माधवराव देशपांडयांची साक्ष कोपरगांवाचे मामलेदारापुढें व्हावयाची होती. तारखेचे दिवशीं ते कोपरगांवास जावयास निघाले. जातांना महाराजांचे दर्शनास गेले आणि कोपरगांवास जाऊन येतों असें म्हणाले. महाराज म्हणाले कशाला जातोस ? नको जाऊं. माधवराव म्हणाले. " गेलें पाहिजे " आणि असें म्हणून निघाले. निमगांवापर्यंत म्हणजे सुमारें दीड मैल गेले. तों समोरून कोपरगांवचे मामलेदार कांहीं मंडळीसह सामोरे भेटले ते इकडेच म्हणजे शिर्डीस येत होते. अर्थात् माधवराव त्यांचे बरोबरच परतले.

( १२३ )

शिर्डीस मागें मार्तंड नावाचा शिंपी होता. तो आजारानें अत्यंत पिडला होता. त्याची शुश्रुषा करणारें कोणी नव्हतें व त्याची अत्यंत आबाळ होत होती. एक दिवस तो रस्त्याजवळ पडलेला असतानां महाराज त्याच रस्त्यानें गेले. त्यांनीं त्याला सांगितलें " तूं निमगांवास नानासाहेब डेंगळ्याकडे जा. तेथें तुझी सर्व सोय लागेल." तो तेथें गेला, तेव्हां नानासाहेब डेंगळ्यांनीं त्याचा सत्कार केला आणि म्हटलें "तुम्हीं येथें आपलें घर समजून रहा आणि तुमचीं सर्व व्यवस्था येथें लागेल. तुमची चांगली तरतूद ठेवण्याविषयीं मला रात्रींच बाबांनीं ( म्ह. साईमहाराजांनीं ) स्वप्नांत दर्शन देऊन आज्ञा केली. अर्थात् आज्ञेप्रमाणें नानासाहेब डेंगळ्यांनी मार्तंड शिंप्याची व्यवस्था चांगली ठेवली आणि तो लवकरच बरा होऊन शिर्डीस आपल्या घरीं आला.

( १२४ ]

एकदां नानासाहेब चांदोरकर येथें मंडळीसह आले असतांना सूर्यग्रहणाची पर्वणी आली. त्या पर्वणीसाठीं कोपरगांवास गोदावरीस्नानाला जाण्याची त्यांना इच्छा झाली. त्यांनीं जाऊन येण्याची परवानगी महाराजांजवळ मागितली आणि महाराजांनीं ती दिली. तेथें गेल्यावर ग्रहण लागल्यानंतर नानासाहेब गोदावरींत स्नानाला उतरले असतां एक मांग "दे दान छुटे गिरान ' असें ओरडत त्यांचेकडे आला. त्यांनी दोन पावल्या दिल्या. इकडे त्याच वेळेला महाराज आनंदराम मारवाडयाला म्हणाले या पहा मला नानांनीं दोन पावल्या दिल्या, असें म्हणून त्या पावल्या महाराजांनीं आपल्या खिशांत घातल्या.

## रा. रा. हरीभाऊ केशव कर्णीक मु॥ डाहाणू यांचे महाराजांबद्दल अनुभव.

१ महाराजांची पहिली भेट:—माझेवर भाऊबंदांनीं खोटा आळ घातला. मोठ्या विचारांत पडलों. माझ्या ध्यानीं पण नाहीं कीं शिरडीस महाराजांकडे जावें. लोक सांगत कीं ते प्रत्यक्ष देव आहेत. व त्यांची लीला अतर्क्य आहे. तें एकून एकाएकीं मनांत आलें कीं शिरडीस जावें. त्याप्रमाणें मी जावयास निघालों. महाराजांकडेस सकाळीं १० वाजतां प्रथम दर्शनास गेलों. दर्शन घेतलें. विडा सुपारी नारळ पुढें ठेविला. दर्शनाचे वेळीं दुसरेही लोक दर्शना करितां आलेले होते. महाराज मला म्हणाले कीं "तुम्ही वाड्यांत राहा." तेव्हां दुसरे बरोबर असलेले लोक मला म्हणाले "तुमची व महाराजांची पूर्वीची ओळख आहे काय? " मी म्हणालों "नाहीं." ते " म्हणाले महाराज तुम्हांस वाडयांत राहण्यास सांगतात व आम्हांस कांहींच सांगत नाहीं. हे कसें?" मी म्हणालों त्यांचे त्यांस माहिती मी काय सांगणार? महाराजांनीं आज्ञा केल्याप्रमाणें मी वाडयांत राहीलों. त्याच दिवशीं दोनप्रहरीं २ वाजतां पुन्हा मशिदींत गेलों. तेव्हां महाराजांनीं आमचे वर निवळ कुभांड रचि-

लेली अशी हकिगत सांगण्याची सुरवात केली. ते म्हणाले " जमिनीचा तंटा काय—नानाला काकांनीं मारले. हें सर्व तुझ्या तात्यांनीं करविलें " इतकें माहाराज बोलले. " व आपण बंदकेलें. पुढें ४ दिवस जाहले. मी विचारांत आहें कीं जरी मजवर खोटा आळ घातला आहे तरीपण याचा शेवट कसा होणार ? चौथे दिवशीं महाराज पुन्हा म्हणाले कीं " ज्यांनीं हें करविलें त्यांचें ६ महिन्यांनीं काय होईल तें पहा–" पुढें मजवरील या खोटया आळाचा निकाल मी निर्दोषी असल्यामुळे महाराजांचे कृपेनें माझ्या मनाप्रमाणें लागला व माझी निष्ठा महाराजांचे चरणीं दृढ झाली.

२ एक वेळ मी शिरडीहून पंढरपूर येथें जात होतों. कोपरगांव स्टेशन-हून पंढरपूरचें टिकीट घेतलें. गाडी दौंड स्टेशनपर्यंतचीच होती. माझे घेतलेलें टिकीट मेल गाडीचें नव्हतें. दौंड स्टेशनवरून जाण्यास थोडयाच वेळानें मेल गाडी होती. पुढें स्टेशनवर असलेले प्यासेंजर वगैरे लोक स्टेशन वरून निघून गेले व स्टेशनची बत्ती ( दिवा ) विझाली, इतक्यांत मला शौचास लागलें. शौचकूपांत जाण्यास दोन जिने चढून गेलें पाहिजे व मजजवळ असलेलें सामान टाकून तिकडे जावें कसें या विचारांत मी आहें तों एक हमालासारखा दिसणारा मनुष्य मजजवळ आला. त्यानें मला शौचकूप व नळ दाखविला व मी शौचास जाऊन आलों इतक्यांत गाडीची वेळ झाली. परंतु माझें टिकीट प्यासेंजरचे असल्यामुळें तें बदलून मेलचें टिकीट आणलें पाहिजे असें त्या मनुष्यानें सांगितलें व माझें टिकीट व पैसे त्याजपाशीं बदलून मेलचें टिकीट आणण्यास दिलें. व तो दोन जिने चढून टिकीट ऑफिसांत गेला. इतक्यांत गाडी आली. तो मला म्हणूं लागला कीं तुम्हीं गाडींत बसा. मी टिकीट आणतों. इतक्यांत गाडी चालू झाली. गाडींत मी बसूं लागलों तों दुसरे लोक म्हणूं लागले कीं, टिकीटाशिवाय गाडींत कसे बसतां परंतु मी त्या मनुष्याचे शब्दावर विश्वास ठेवून चालू झालेल्या गाडींत बसलों. गाडी चालू होऊन थोडया अंतरावर गेल्यानंतर त्यानें मला टिकीट आणून दिलें.

३ आमची सून आंधेरीस ५ वर्षे आहे. तिचें डोकें फिरलें होतें. त्याबद्दल आंधेरीहून पत्र आलें कीं " डोकें बिघडलें आहे. १ महिना झाला करितां तुम्ही येऊन डहाणूस घेऊन जा. " मला पत्र सकाळीं पोहोंचलें व मी त्याच दिवशीं सकाळीं ११ वाजताचे गाडीनें आंधेरी येथें जाण्यास निघालों,व त्याप्रमाणें गाडींत बसलों गाडी पालघर स्टेशनपर्यंत गेली असेल, मी ज्या डब्यांत बसलों होतों त्याच डब्यांत माझे पाठीमागें एक कफनी घातलेला फकीर बसला होता. तो माझ्याशीं बोलूं लागला की " परमेश्वरानें जंगलांत झाडें निर्माण केलीं आहेत तीं कांहींतरी उपयोगाचीं असतात. कोणते झाडाचा काय उपयोग होतो तें तुम्हांस माहीत नाहीं; परंतु मला सर्व झाडांचे उपयोगाची माहिती आहे. असें म्हणून मला " गाडींतूनच " एक झाड दाखविलें व सांगितलें तें पहा झाड; नीट लक्षांत ठेवा. ज्याचे घरीं मनुष्य वेडे झाले असेल त्याचे वेडया मनुष्यास या झाडाचा पाला वांटून दिल्यास वेडें माणूस बरें होईल " इतकें सांगितलें. त्यानंतर ३ तास मी शुद्धींत नव्हतों. विचारांत पडून स्वस्थच बसून राहिलों होतों. पुढें वांद्रें स्टेशन आल्यावर लोक बोलूं लागले तेव्हां सावध जाहालों व मागें पाहतों तों तो फकीर जागेवर नाहीं, तो कुठून आला कोठें उतरला याचा तपासच लागला नाहीं. असो पुढें त्यानें सांगितल्याप्रमाणें त्या झाडाचें औषध मी आपल्या सुनेस दिलें व ३ दिवसांनीं तिला गूण आला. त्या नंतर २ वर्षांनीं पुन्हां तिचें डोकें बिघडलें व पुन्हांही त्या फकिरानें सांगितलेलेंच औषध दिलें व त्याचाही गूण आला.

४ आमचा नातू चि. शिवरामचा मुलगा चि. केशव हा श्रीमहालक्ष्मीचे यात्रेहून परतयेत असतानां वाटेंत दुपारीं मुक्कामाकरितां नदीचे कांठीं इकडून १० मैलावर राहिले होत. दुपारीं नदींत पोहण्याकरितां गेला असतां हातांतील सोन्याची आंगठी "१॥ तोळा वजनाची " नकळत पाण्यांत पडली. पुढें बरसाद गेल्यावर म्हणजे ६ महिन्यानीं ठाकूर जातीचा एक इसम आमचे

एथें आला व म्हणाला कीं येथील एकादे मुलाची आंगठी तो श्रीमहालक्ष्मीचे यात्रेहून घरीं परत येतानां नदींत पडली होती काय ? ती मला सांपडली आहे. असें म्हणून त्यानें आंगठी आणून दिली.

५ माझी नात चि. शिवरामाची मुगली लीला ही मी शिरडीस असतांना डहाणूस निवर्तली. मी त्यावेळीं शिरडीस होतों. दोन प्रहरची महाराजांची आरती झाली, त्यावेळीं मी महाराजांजवळ बसलों होतों. आरती झाल्यावर जेवण्यास गेलों. नंतर दुपारीं ३ वाजतां मशिदींत येतों तों मी पायरीचे खालीं असतानांनां महाराज म्हणाले "आतां वर येऊं नको. घरीं जा. मध्यें कोठें उतरूं नको" महाराजांनीं सांगितल्या प्रमाणें मी ताबडतोब घरीं आलों तों चि. लिली हीस काल दुपारीं १ वाजतां देवाज्ञा झाल्याचें समजलें.

## Pages 52 to 53

Sainmaharaj then told a story. He said there was a princess living in a palace. A "Mang" sought shelter with her. Her sister-in-law who was there also, refused it to the mang. So the mang with his wife was returning disconsolate to his village when he met Alla-Minya in the way and told his story, how, stricken with poverty, he sought shelter and was refused. Alla-minya advised him to return with his wife and seek shelter once more with the same princess. He did so and was admitted and treated like a member of the family. The mang stayed enjoying all the comforts for over six months and then coveting gold murdered the princess with an axe. The people round-about assembled in large numbers and held a panchayat. The mang admitted the offence, when the matter went to the king in due course. Alla-minya advised him to let the mang go The king obeyed. The princess murdered by the mang came to be born of him as his daughter and he came once more to the palace and was permitted to stay there in affluence and ease for twelve years. Then Alla-minya inclined the king to avenge the murdered princess and the mang was killed in the same way in which he had killed the princess. The mang's widow returned to her village accepting the mang's fate as just. The princess who was born as daughter to the mang came to the place, took possession of what belonged to her in the former reincarnation and lived happily afterwards. There was the work of God done and his justice vindicated. There was Shej Arti at night, Bhishma's Bhajan, and Dixit's Ramayana. Ram Maruti to-day embraced Sayin Maharaj when the latter was going in procession to chawadi for the Shej Arti.

5-1-12.

In the morning I got up early though I did not sleep well at night. I attended the Kakad Arti. Sayin Maharaj was in a pleased mood. My son Baba and Gopalrao Dorle went to him. On seeing them he said "go". Taking this as permission to return they hired Bala Bhaoo's tanga and went away. I prayed and saw Sayin Maharaj go out and again after he returned. He